# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 21/10/2020 (बुधवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 0.5 किमी अंतरावर इतवारी मार्केट येथे दिनांक 19/10/2020 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. लक्ष्मीबाई अरून शाहु, वय 55 वर्ष, रा. सोनेझरी उमरेड या भाजी पाला घेण्याकरीता ईतवारी मार्केट येथे गेल्या होत्या. त्या भाजीपाला खरेदी करीत असतांना त्यांचे आजुबाजुला तिन ते चार महिला भेंडी खरेदी करण्यास आल्या होत्या त्यापैकी एका अज्ञात महिला आरोपीने फिर्यादींच्या गळयातील 03 तोडयाचे मंगळसुत्र किं 30,000/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा विठ्ठल तितरमारे 7722004342 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. देवलापार – दिनांक 19/10/2020 चे 19.00 वा. ते 20.00 वा. चे सुमारास पो.स्टे. देवलापार हद्दीत फिर्यादी या भाजीपाला विकण्याकरीता बाहेरगावी गेल्या होत्या. त्यादरम्यान अरोपीने फिर्यादींच्या 16 वर्षीय मुलीला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे.देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोधे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक घोडके या करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर